स्थापना - १८८७

# नगर परिषद कार्यालय, वाशिम.

E-mail-mcwashim@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०७२५२-२३२००९

फॅक्स क्रमांक ०७२५२-२३१०४१

जा.क्र. :नपवा /नियो/कार्या-१४/बा.परवानगी/ 631 / २०१५

नगर परिषद कार्यालय,वाशिम जि.वाशिम .

दिनांक :- 29/05/2015.

---

## परिशिष्ट - ड

**( उपविधी नियम न-१०.१)**

**जोत्या पर्यंत बांधकाम परवाना**

प्रेषक

नियोजन प्राधिकरण
वाशिम नगर परिषद,वाशिम

**श्री टेक्टॉन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा.लि.**

**तर्फे डायरेक्टर श्री रजनीश जैन**

रा. लाखाळा, वाशिम ,

जिल्हा वाशिम

**संदर्भ :-** आपला दि.१६.०५.२०१५ रोजीचा अर्ज

आपणांस कळविण्यात येते की, आपले बांधकाम प्रकरण दिनांक **16. 05.2015** च्या अर्जा नूसार मौजे वाशिम (गोंदेश्वर) येथील **S. NO. 59** मधील भूखंड क्र. **Plot No.01** वार्ड क्र. 10 महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ४५ अन्वये खालील अटी/शर्तीना अधीन राहून बांधकाम प्रारंभ परवाना देण्यात येत आहे .

अटी/शर्ती :-

१) सदर बांधकाम प्रारंभ परवाना इमारतीच्या जोत्या पर्यंतचे ( Plinth Level ) आहे .जोत्या पर्यंत (Plinth Level ) बांधकाम झाल्यानंतर Appendix 'F'मध्ये मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना तसे कळविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर इमारतीचे पूढील बांधकामास नाहरकत देण्यात येईल .

२) बांधकाम मंजूरी आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन सदर मंजूरी एका वर्षा पर्यंत वैध राहिल.

३) बांधकाम परवानगी केवळ **निवासी /व्यवसायीक/इमारतीचे/तळ मजला/ पहिला मजला/दूसरा मजला/ तिसरा मजला व चौथा मजला** करिता आहे .

४) नकाशात दूरुस्त केल्याप्रमाणे बांधकाम करावे लागेल.

५) बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार मुख्य अधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करता कामा नये

६) बांधकाम चालु केल्याचा व पूर्ण झाल्याचा वेगवेगळा अहवाल नगर परिषदेस देणे बंधनकारक राहील.

७) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या कार्यालया कडून वापर प्रमाणपत्र प्राप्त करावे .

८) इमारत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मुख्याधिकारी यांचा वापर प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय इमारत वापर सुरु करण्यात येवू नये .

९) जागेच्या मालकी हक्का बाबत अथवा जागेच्या हद्दी बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील .

१०) रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र नगर परिषदेकडे नोंदणीकृत बक्षीसपत्राद्वारे विनामूल्य हस्तांतरीत करुन देणे बंधनकारक आहे .

११) सांडपाणी व्यवस्थापनासाठी शुध्दीकरण पध्दतीने पूर्नवापर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र युनिट तयार करुन स्वयंपाकघरातील व न्हाणीघरा मधील पाण्याचा पूर्नवापर करणे बंधनकारक आहे .

१२) महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा(नियंत्रण) अध्यादेश,२००६ नुसार टाकावू पदार्थगोळा करण्यासाठी/आपल्या जागेत साठवून ठेवण्यासाठी दोन स्वतंत्र कचरा कुंडया (हिरव्या व पांढ-या रंगाच्या ) ठेऊन ओला व सुका कचरा ठेवण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल .

१३) सदर इमारती मध्ये आवश्यक त्या ठिकाणी नियमानूसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी .

१४) प्रस्तावित बांधकाम हे भूकंप प्रतिरोधक असल्याची खात्री करुन घ्यावी व भूकंपा पासुन हानी होवू नये म्हणून इमारतीच्या स्थैर्याबाबत इमारतीचे RCC डिझाइन सक्षम वास्तु विशारद यांचे कडुन करुन घ्यावे.

१५) प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये पावसाळी पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग/गटारे असतील तर ते अबाधित ठेवावेत किंवा त्यांची योग्य ती व्यवस्था करावी . कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करु नयेत .

१६) छतावरिल पाणी साठविण्या करिता रेन वाटर हार्वेस्टींग बंधनकारक राहील.

१७) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

१८) बांधकामाचे परिक्षेत्रात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम,१९७५ नूसार झाडे लावणे आपलेवर कायदेशिर बंधनकारक राहिल .

१९) प्लास्टीक वापराबाबत शासन व नगर परिषद यांचे कडून वेळोवेळी होणा-या आदेशाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहिल .

२०) सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवून विद्युत वापर कमी करण्याबाबत उपाययोजना करावी.

२१) सांडपाण्याची पाईप लाईन नगर परिषदेच्या प्रस्तावित भूयारी गटार योजनेच्या पाईप लाईनला जोडणे बाबतची तजविज करणे बंधनकारक असून याबाबत नगर परिषदे कडून वेळोवेळी केल्या जाणा-या सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे .

२२) इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा योजनेची नळजोडणी घेणे बंधनकारक आहे अन्यथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही .

२३) बांधकाम करतांना रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी . साहित्य रस्त्यावर असल्यास नगर परिषदे कडे जमीन भाडे भरावे लागेल .

२४) पाण्याचा निच-या करिता आपणांस स्वखर्चाने पक्की नाली बांधून व्यवस्था करणे बंधनकारक असेल .

२५) बांधकामामुळे नगर परिषदेच्या रस्त्याचे नालीचे नुकसान झाल्यास त्याची आपणा कडून भरपाई केल्या जाईल.

२६) सदर इमारती मध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००९ नूसार आवश्यक ती आग प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी . सदर उपाययोजना करण्याकरिता मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई यांनी नियुक्त केलेल्या अभिकरणा मार्फत करण्यात यावी . सदर अभिकरण यांची यादी ही शासनाच्या www.mahafireservices. org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MUNICIPAL CO... SEAL ... WASHI...

मुख्य अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
वाशिम नगर परिषद,वाशिम

प्रत माहितीसाठी सादर .

१)मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

२)कर विभाग, नगर परिषद वाशिम, यांना माहिती करिता रवाना .

-स्वा-

मुख्य अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी
वाशिम नगर परिषद,वाशिम